शोध पत्र- मराठी

# मराठी ग्रामीण कविता आणि जागतिकीकरण

* प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड़

* श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती

**प्रस्तावना -**

ग्रामीण साहित्य चळवळीला १९७० ते ७५ सुरुवात झाली असली तरी त्याची पार्श्वभूमी मात्र अगोदरच निर्माण झाली होती. तत्कालीन खेडे, खेडयातील समस्या, ओला दुष्काळ कोरडा दुष्काळ, शेतकऱ्याच्या आत्महत्या, शेती, निसर्ग, शेतीविषयक साधने इ. सर्व गोष्टीचे वर्णन तत्कालीन ग्रामीण साहित्यात चित्रित झाल्याचे दिसून येते. महात्मा फुले, महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून १९६० नंतरच्या ग्रामीण लेखकाना प्रेरणा मिळाली आणि ग्रामीण साहित्याचा उदय झाला. १९९० नंतरचा कालखंड हा अतिशय गतिमान झाला. या कालखंडात ग्रामीण साहित्य प्रवाहही वेगाने पुढे धाऊ लागले. खेड्या-पाड्यातील सर्व समस्याचे प्रतिबिंब हे ग्रामीण साहित्यातून उमटू लागले. जागतिकीकरणामुळे खेड्याची झालेली बकाल अवस्था,मागासलेपणा, शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक समस्या. त्यांच्या व्यथा, वेदना ग्रामीण साहित्य प्रवाहात वास्तव रुप घेऊन ग्रामीण साहित्य अधिक समृध्द झाले. देशांनी स्वीकारलेले खुले आर्थिक धोरण , जागतिकीकरण, खाजगीकरण, आर्थिक उदाराकरण यामुळे समाजाचे अस्तित्व धोक्यात आले. त्याचा परिणाम खेड्यातील अनेक घटकावर झाला.

ग्रामीण हा शब्द संस्कृत मधील ग्राम या शब्दापासून सिध्द झाला आहे. ग्राम या शब्दाचा अर्थ मराठीत गाव असा आहे. यावरुन ग्रामीण म्हणजे ग्राम जीवनाशी निगडीत असे ग्रामीण साहित्य म्हणता येईल. ग्रामजीवनाचे काव्यदर्शन घडविणाऱ्या कवितेला'ग्रामीण कविता' ही संज्ञा वापरत असतांना कोणत्या कवितेला ग्रामीण कविता म्हणायचे या संदर्भात विश्वास जहागीरदार यांनी केलेले विवेचन मोलाचे वाटते. ते म्हणतात, - "ग्रामीण कवितेमध्ये बाह्य वास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपरिक मुल्ये यातून घडलेली ग्रामजीवन आणि त्यात आकार रुपाला आलेली संवेदनाशीलता त्या जीवनातील अनुभवा विषयीच्या प्रतिक्रीया देत असते. अशा कवितेच्या निर्मीतीच्या मुळाशी असलेली संवेदनशिलता ही ग्रामीण संवेदनशिलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे. असे ढोबळ मानाने म्हणता येईल."[1] थोडक्यात खेड्यातील जीवन तेथील कृषीसंस्कृती, तेथील जीवनाच्या विविध जाणीवा आपल्या कलात्मक व सहज, वास्तव, खेड्याचे बदलते स्वरुप आपल्यापूढे या ग्रामीण साहित्यातून साकार होते. या ग्रामीण मराठी कविता पूर्वीच्या कवितेपेक्षा अधिक वास्तवाभिमुख व जनसापेक्ष झाली. निसर्गसौंदर्य, रंजनता यामध्ये फारशी ती न रमता ग्रामीण जीवनाचे अतिशय भिषण दाहक वास्तव मोठया जोमाने प्रकट करु लागली. यामध्येविठ्ठल वाघ, नारायण कुळकर्णी कवठेकर, श्रीकांत देशमुख, इंद्रजित भालेराव, ना. धो. महानोर, सुनिल अवचार, सदानंद देशमुख, हेमंतकुमार कांबळे, अनिल पाटील, देविदास चौधरी, शंकर बढे, सुधाकर गायधनी, भुजंग मेश्राम, इत्यादी कवींनी ग्रामीण जीवनातील वर्तमानात जागतिकीकरणामुळे होरपळणाऱ्या ग्रामीण जीवनाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येतात.

'खेडयांकडे चला' असा महात्मा गांधींनी संदेश देऊन शहरांची आणि ग्रामीण भागांची नाळ जोडून ग्रामीण भागाच्या विकासाचा विचार केला होता. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय जागतिकीकरणाचे वारे खेड्याला पोषक ठरणार नाही असे वाटते. या जागतिकीकरणाच्या संवेदना पाणडोह, रानवेल, उजाळा, कुणबी बाप,मेघवृष्टी, महासत्तेची पीडादान,अंतरीचा भेद,पाढा,आषाढमाती, शिवरातल्या कविता, डोंगरमाथा, अंतरीचा भेद या अनेक मराठी ग्रामीण काव्यासंग्रहातून मोठया ताकदीनीशी साकार झालेल्या आहेत. तत्कालीन परिस्थितीचा साहित्यावर मोठा प्रभाव पडत असतो. ग्रामीण साहित्याचा मुख्य आधार शेती आहे. परंतु आज शेती व्यवसायाची स्थिती फार वाईट आहे. मजुरांची उणीव,शेतलागवडीचा वाढता खर्च, उत्पादीत केलेल्या मालाला योग्य भाव न मिळणे, अशा अनेक समस्यां शेतकऱ्यांना भेडसावत असतात. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे. सावकारी पाश अधिकाधिक आवळल्या जात आहे. योग्य वेळेवर कोणतीही मदत न मिळणे ही शासनाची उदासीनता त्यांच्या घोषणांच्या बेमोसमी पावसात त्यांचे सर्वस्व हिरावल्या जाते याबाबतीत डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात

*'आज परागंदा झाली माणसं,*
*वांझ झाली खेडी, अन् शहरांना दिवस गेले*
*खेडयांकडे चला म्हणणारे गांधीजी कुठे गेले ? '*

अशी ही जागतिकीकरणावर भाष्य करणारी कविता समाजाच्या अंत:करणाशी नाते सांगते "शेतकरी ग्रामीण सर्जनातून माणसाला भुकेतून मुक्त करतो, स्वार्थ, मोह, आसक्ती व आत्मप्रेम यापासून मुक्त करतो आणि मोक्षाच्या लालसेतून माणसाला मुक्त करीत असतो. म्हणून शेतकरी म्हणजे मानवी जीवनाचे बंधमुक्त आणि उन्नत रुप होय."[2] अशा या शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख कधी न संपणारे असतात तरीही हा शेतकरी आशावादी असतो. हा आशावाद प्रकाश किनगावकर 'गावच्या आकाभोवती' या काव्यसंग्रहातून सहजपणे व्यक्त करतात -

‘ आता पावसाची सर येईल
अन् रेघांना पालवी फुटेल शब्दांची’

अशा आशावाद असतांना त्यांच्या पदरी निराशाच पडते कधी कोरडा दुष्क्राळ तर कधी ओला

दुष्काळ तर कधी दलालाची पिळवणूक हे शेतकऱ्यांच्या पाचविलाच पूजलेले आहे. म्हणून त्यांना डोळयासमोर आपले मरणच दिसते म्हणून इंद्रजित भालेराव आपल्या ‘पिकपाणी’ या काव्यसंग्रहात शेती मातीशी इमान राखुन वास्तवाचे चित्रण करताना दिसते. ते म्हणतात

*‘लाजरेपणा, बुजरेपणा बाजारात ईक*
*घेऊ नको फाशी बाबा खाऊ नको ईख*
*माग माग नको, पुढं सरायला शिक*
*आत्महत्या नको, हत्या करायला शिक’*

जगाला जगवणारा हा शेतकरी उपाशी मरतो, त्याच्या पुढच्यापिढ्या मातीत राबातात व मरतात हे भारतासारख्या अभागी देशात जन्माला येणाऱ्यांचे शेतकऱ्याचे दु:ख जो शेतकरी जगाची भूक भागवितो त्याची ही अवस्था कवी विठ्ठल वाघ म्हणतो की,

*‘आम्ही जन्मलो, जन्मलो*
*किती होणार गा माती*
*खापराच्या दिव्यात आमच्या*
*कधी येणार वाती’*

अशाही परिस्थितीत शेतकरी आपल्या दोन्ही हाताचा आधार करत आपली वात पेटविण्यासाठी धडपडतो या सामाजिक परिस्थिमुळे शेतकऱ्याच्या जीवनात कसे् प्रश्न निर्माण होतात.तो रात्रंदिवस राबराब राबतो, रक्त ओकतो तरीही हंगाम त्याचा नसतो. श्रीकांत देशमुख आपल्या ‘बारमाही’ या कवितेत म्हणतात -

‘बारमाही राबणाऱ्या जिवानं
पुसू नयेत दिवस हंगामाचे
बुडता दिवस कोणत्या मावळतीला
होऊ नये अंदाज याचा
बैल ओढती मोट
ओढावं आयुष्य तसच ....च’

जसे आपण बैलाचे कष्ट नजरेआड करतो तशीच अवस्था आज शेतकऱ्यांची झाली आहे.श्रम आणि इमान या उभयस्तरावर ग्रामीण माणूस अजूनही कायम ताठ उभा आहे. इतरांनी त्याची पर्वा केली नाही ग्रामीण कवितेचा केंद्रवर्ती घटक या कवितेत सर्वकष होऊनही टिकून राहिलेला आहे. पण फसव्या अवस्थेने मात्र त्याची सतत फसवणूकच केलेली आहे.त्याच्या अवस्थेवर येथील समाजव्यवस्थेने, शासनाने अजूनपर्यंत उपाय शोधून काढलेले दिसत नाहीत म्हणून ग्रामीण साहित्यिक ग्रामीण जीवनातील वर्तमान भयावह वास्तव उजागर करतात.

शशीकांत पाटील म्हणतात -

‘ बाळ तू जन्म घेऊ नकोस
जीवनमूल्य अन् नितिमूल्य हरवलेल्या समाजात’

अशा प्रखर वास्तवाची जाणीव करुन सावध राहण्याचा सल्ला देतात. मराठी ग्रामीण कवी संवेदनशीलपणे जागतिकीकरणातील वास्त उजागर करतांना दिसतात त्याचे जगणेभोगणे आपल्या संवेदनाच्या पातळीवरुन शब्दाच्या व भाषेच्या पातळीवर उतरविलेले आहे. त्यांनी ते शब्द व भाषा आपल्या काव्यातून अविष्कृत केली. या कविने जागतिकीकरणाच्या वास्तवस्पर्शी गरुडझेप अभिव्यक्त केली आहे. सत्ता, सरकार, शिक्षण, लोकशही, भ्रष्टाचार,राजकारण, शिक्षण संस्था, बाजार,उद्योग, व्यवस्था,बदमाश,लुटारु या सर्वांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मागणारी आजची ही कविता जशी संवेदन गर्भ आहे तशीच ही कविता पुष्कळ चिंतनगर्भ आहे.तिचा उगम विचारातून विचाराकडे आणि सांप्रत व्यवस्थेतील व्यंकटीवर अस्त्र उपसण्यासाठी झाला आहे. ही कविता म्हणूनच फक्त भाषिक परिप्रेक्ष्य दर्शविणारी नाही, तर ही कविता मुळातले ग्रामसंवेदन जपत एका धाडसाने प्रकट होत जाते. वर्णन करुन विषय रंगवून सांगण्याचा चलाखी या कवितेकडे अजिबात नाही. ही कविता आता संघर्ष वाहिनी होऊ पाहते आहे. घर आणि शिवार यांच्या जागर उत्पन्न करण्याची क्षमता होऊन आलेली ही आजची ही मराठी ग्रामीण कविता आहे”[3] १९९० नंतर निर्माण झालेल्या कविता उत्तरोत्तर समृध्द बनत असल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१. जहागिरदार विश्वास, म.सा.पत्रिक, (ग्रामीण साहित्य विशेषांक ) जुलै - डिसेंबर, १९८०, पृ. ८९
२. पोशिंद्याची कविता- संपादन, डॉ. गजानन जाधव, ‘शेतकरी बापाचे भावोत्कट आणि भव्योदात्त दर्शन,’ डॉ. द.ता. भोसले, पैलू प्रकाशन, बुलढाणा,२०१० पृ. १५
३. देशमुख, डॉ. केशव सखाराम,कविता-रति, मार्च-एप्रिल २०१०, पृ ३९